पुढारी

# श्री रवळनाथ को-ऑप सोसायटीतर्फे पोलिसांना मोफत मास्क वाटप

**कुडाळ : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्याकरिता श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे मोफत मास्क वितरित करण्यात आले. राष्ट्रीय आणि वैयक्तिक संकटाच्यावेळी मदतीचा हात देण्यासाठी सर्वप्रथम धावणाऱ्या या संस्थेने जगावर ओढवलेल्या कोरोना विरोधातील लढ्यातही खारीचा वाटा उचलून सामाजिक बांधिलकीचा प्रयत्न रवळनाथने दिला.

कुडाळ पोलिस ठाण्यातील सर्व पोलिस कर्मचारी व होमगार्ड यांना हे मास्क वाटण्यात आले. विशेष म्हणजे येथील महिला बचत गटाकडून हे मास्क खास तयार करून घेण्यात आल आले आहेत. त्यातून महिलांना घरबसल्या रोजगारही मिळाला. हे मास्क कॉटन कापडापासून तयार करण्यात आले असून स्वच्छ धुऊन त्याचा पुनर्वापर करता येईल, असे आहेत.

विविध सामाजिक उपक्रम कल्पकतेने राबविणाऱ्या रवळनाथने या उपक्रमातही आपले वेगळेपण कायम राखले आहे. रवळनाथ कुडाळ शाखा सल्लागार प्रा. डॉ. कॅप्टन एस. टी. आवटे, अकौटंट विक्रम जांभेकर व अधिकारी वर्ग उपस्थित होते.



कुडाळ : पोलिस निरीक्षक शंकर कोरे यांचेकडे मास्क सुपूर्द करताना रवळनाथचे कुडाळ शाखा सल्लागार प्रा. डॉ. कॅप्टन एस. टी. आवटे, अकौटंट विक्रम जांभेकर. सोबत इतर अधिकारी वर्ग.